
# राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर

(अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालय)

## शाहू व्याख्यानमाला: पुष्प ६४ वे अहवाल



**पद्मश्री डॉ. अभय बंग**

## विषय : पर्यायी शिक्षण शक्य आहे

प्रमुख वक्ते : **पद्मश्री डॉ. अभय बंग**, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व विचारवंत

आयोजक : शिव छत्रपती शिक्षण संस्था, राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर (अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालय)

आयोजन स्थळ: राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर (अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालय)

दिनांक : गुरुवार, १३ फेब्रुवारी २०२६

वेळ : सायं. ५.०० वा.

स्थळ : राजर्षी शाहू महाविद्यालयाचे सभागृह

---

**प्रस्तावना :**

शिव छत्रपती शिक्षण संस्था, लातूर ही केवळ शिक्षण देणारी संस्था नसून Pursuit of Excellence ची जोपासना करणारी आणि सामाजिक परिवर्तनाची दिशा देणारी एक सशक्त चळवळ आहे. संस्थेच्या वैचारिक उपक्रमांमध्ये “शाहू व्याख्यानमाला” ही एक प्रतिष्ठित आणि दूरदृष्टीपूर्ण परंपरा आहे. या व्याख्यानमालेचे ६४ वे पुष्प ‘पर्यायी शिक्षण शक्य आहे’ या अत्यंत महत्त्वाच्या समकालीन आणि चिंतनप्रवर्तक विषयावर गुंफण्यासाठी प्रमुख वक्ते पद्मश्री डॉ. अभय बंग, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व विचारवंत यांना निमंत्रित करण्यात आले. बदलत्या काळात शिक्षण

व्यवस्थेची नव्याने मांडणी करणे, विद्यार्थ्यांना केवळ पदवीधर नव्हे तर सक्षम, संवेदनशील आणि समाजाभिमुख नागरिक बनविणे हा या कार्यक्रमामागील मूलभूत हेतू होता.

**उद्दिष्टे:-**

- पारंपरिक शिक्षणव्यवस्थेचे चिकित्सक परीक्षण करणे.
- पर्यायी शिक्षणाच्या संकल्पनेची सखोल मांडणी करणे.
- कौशल्याधारित, मूल्याधारित आणि अनुभवाधारित शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करणे.
- विद्यार्थ्यांमध्ये सृर्नशीलता व सामाजिक बांधिलकी विकसित करणारी शिक्षण पद्धतीचा विचार करणे.
- शिक्षण आणि जीवन यांच्यातील तफावत कमी करणे, जीवन हेच शिक्षण हे मूल्य रुजविणे.

**मान्यवरांची उपस्थिती :**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. डॉ. गोपाळराव पाटील, अध्यक्ष, शिव छत्रपती शिक्षण संस्था, लातूर हे विराजमान होते. प्रमुख पाहुणे म्हणून पद्मश्री डॉ. अभय बंग, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व विचारवंत यांची प्रेरणादायी उपस्थिती होती.

तसेच कार्यक्रमास संस्थेचे मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते-

- डॉ. अजय जाधव - उपाध्यक्ष
- डॉ. शिवाजीराव सूर्यवंशी - सहसचिव
- श्री. उद्धव पाटील - सहसचिव
- प्राचार्य अनिरुद्ध जाधव - माजी सचिव
- प्राचार्य डॉ. रावसाहेब कावळे - कार्यकारिणी सदस्य
- श्री. धर्मराज हल्लाळे - कार्यकारिणी सदस्य
- श्री. अमर देशमुख - कार्यकारिणी सदस्य

मंचावर महाविद्यालयांचे प्राचार्य व मान्यवर उपस्थित होते.

- डॉ. महादेव गव्हाणे – प्राचार्य
- प्रा. सदाशिव शिंदे – उपप्राचार्य
- डॉ. संभाजी पाटील – शाहू व्याख्यानमाला प्रभारी

याशिवाय विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापकवर्ग, संशोधक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सभागृहात उत्साह, अपेक्षा आणि बौद्धिक जिज्ञासेचे वातावरण निर्माण झाले होते.

**कार्यक्रमाची सुरुवात :**

कार्यक्रमाची सुरुवात पारंपरिक दीपप्रज्वलनाने अत्यंत मंगलमय वातावरणात झाली. दीपप्रज्वलन हे ज्ञान, प्रकाश आणि प्रबोधनाचे प्रतीक मानले जाते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमास औपचारिक प्रारंभ करण्यात आला. त्यानंतर प्रमुख अतिथी पद्मश्री डॉ. अभय बंग, अध्यक्ष मा. डॉ. गोपाळराव पाटील तसेच इतर सर्व मान्यवरांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि स्मृतिचिन्ह देऊन सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला.

**प्रास्ताविक : प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे**

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागतपर भाषण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांनी अत्यंत प्रभावी शब्दांत केले. आपल्या भाषणात त्यांनी राजर्षी शाहू महाविद्यालयाची शैक्षणिक परंपरा, गुणवत्तापूर्ण शिक्षणाची बांधिलकी आणि सामाजिक जाणीवेने प्रेरित कार्य यांचा गौरवपूर्ण उल्लेख केला. त्यांनी राजर्षी शाहू महाराजांच्या समतावादी, लोकाभिमुख आणि सर्वसमावेशक शिक्षणाच्या तत्त्वज्ञानातून प्रेरणा घेऊन हे महाविद्यालय कार्यरत आहे. "शिक्षण म्हणजे केवळ माहिती देण्याची प्रक्रिया नसून विद्यार्थ्यांच्या अंतर्मनातील सुप्त शक्ती जागृत करण्याची साधना आहे," असेही त्यांनी नमूद केले. डॉ. गव्हाणे यांनी पुढे सांगितले की, आजच्या स्पर्धात्मक आणि ताण-तणावपूर्ण युगात विद्यार्थ्यांना केवळ गुण आणि पदव्या नकोत, तर जीवनसमृद्धी, विचारक्षमता आणि सामाजिक जाणीव आवश्यक आहे. त्यामुळे 'पर्यायी शिक्षण' ही संकल्पना केवळ वैचारिक चर्चा नसून काळाची गरज आहे. पद्मश्री डॉ. अभय बंग यांचा परिचय करून देताना त्यांनी त्यांच्या सामाजिक कार्याचा, ग्रामीण आरोग्य क्षेत्रातील योगदानाचा आणि संवेदनशील दृष्टिकोनाचा गौरव केला. "डॉ. अभय बंग यांचे विचार आपणा सर्वांना नव्या दिशेने विचार करण्यास प्रेरित करतील," असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**प्रमुख व्याख्यान – पद्मश्री डॉ. अभय बंग**

पद्मश्री डॉ. अभय बंग यांचे व्याख्यान हे या संपूर्ण कार्यक्रमाचे आत्मा आणि केंद्रबिंदू ठरले. त्यांच्या शांत, संयत, ओघवत्या आणि हृदयाला भिडणाऱ्या शैलीमुळे सभागृहातील प्रत्येक श्रोता सुरुवातीपासून शेवटपर्यंत तन्मयतेने ऐकत राहिला. त्यांनी आपल्या भाषणाची सुरुवातच शिक्षणाच्या मूळ उद्देशावर प्रश्न उपस्थित करीत केली. "आपण शिक्षण का घेतो? केवळ नोकरीसाठी की, जीवन समजून घेण्यासाठी?" त्यांच्या या प्रश्नाने सर्वांना अंतर्मुख केले. त्यांनी ठामपणे सांगितले की शिक्षण म्हणजे केवळ पदवी, गुण, प्रमाणपत्रे किंवा करिअर घडविण्याचे साधन नव्हे; तर ते व्यक्तिमत्त्वाची सर्वांगीण घडण, चारित्र्यनिर्मिती, मूल्यसंवर्धन आणि समाजाशी असलेली जबाबदारी विकसित करणारी सजीव प्रक्रिया आहे. शिक्षणाने माणूस संवेदनशील, विचारशील, नैतिक आणि जबाबदार बनला पाहिजे. केवळ कुशल कर्मचारी तयार करणे हा शिक्षणाचा अंतिम हेतू असू शकत नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. सध्याच्या पारंपरिक शिक्षणपद्धतीतील मर्यादांवर प्रकाश टाकत त्यांनी अत्यंत परखड शब्दांत वास्तव मांडले. पाठांतरावर आधारित अभ्यासपद्धती, गुणांसाठीची अतिरेकी स्पर्धा, परीक्षाभिमुख दृष्टिकोन, सर्जनशीलतेला मिळणारा कमी वाव, कला-क्रीडा आणि जीवनकौशल्यांकडे होणारे दुर्लक्ष यामुळे विद्यार्थ्यांचा नैसर्गिक विकास खुंटतो, असे नमूद करीत आजचा विद्यार्थी माहितीने समृद्ध असला तरी भावनिकदृष्ट्या असुरक्षित आणि सामाजिकदृष्ट्या तुटलेला दिसतो, ही खंत त्यांनी व्यक्त केली. आजची आपली शिक्षणव्यवस्था विद्यार्थ्यांना प्रश्न विचारण्याऐवजी शांत राहण्याची, गप्प बसण्याची सवय लावते आणि चिकित्सक

विचारशक्तीला मर्यादा घालते, असे त्यांनी सांगितले. शिक्षणात आनंद, जिज्ञासा आणि शोधभावना टिकून राहणे अत्यावश्यक आहे, यावर त्यांनी विशेष भर दिला.

पर्यायी शिक्षणाची दिशा स्पष्ट करताना त्यांनी 'अनुभवातून शिकणे' (Learning by Doing) या संकल्पनेचे महत्त्व अधोरेखित केले. शिक्षण हे वर्गखोल्यांपुरते मर्यादित न राहता ते समाजाशी, पर्यावरणाशी आणि वास्तव जीवनाशी जोडले गेले पाहिजे. प्रकल्पाधारित शिक्षण, समस्याधारित अभ्यास, कौशल्याधारित अभ्यासक्रम, मूल्याधारित अध्यापन आणि विद्यार्थीकेंद्रित पद्धती यांचा अवलंब करणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी पाठ्यपुस्तकातील उत्तरांपुरते न थांबता स्वतः प्रश्न निर्माण केले पाहिजेत, विचारांची चिकित्सा करीत समस्यांचे सर्जनशील निराकरण शोधण्याची वृत्ती विकसित केली पाहिजे. शिक्षणाने आत्मविश्वास, संवादकौशल्य, नेतृत्वगुण आणि सामाजिक संवेदनशीलता वाढवली पाहिजे, असे त्यांनी अधोरेखित केले.

डिजिटल क्रांती, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि तंत्रज्ञानाच्या वेगवान प्रगतीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी महत्त्वपूर्ण मुद्दा मांडला की, 'माहिती आता एका क्लिकवर उपलब्ध आहे; परंतु संवेदनशीलता, सहानुभूती, नैतिकता आणि करुणा' ह्या मानवी भावना कोणतेही तंत्रज्ञान देऊ शकत नाही. भविष्यातील शिक्षण तंत्रज्ञानाचा सुजाण वापर करताना मानवी मूल्यांची जोपासना करणारे असले पाहिजे. तंत्रज्ञान आणि मानवी मूल्यांची संतुलित सांगड हीच भविष्यातील शिक्षणाची खरी ओळख असेल, असे त्यांनी स्पष्ट केले. शिक्षक आणि पालकांच्या भूमिकेविषयी बोलताना त्यांनी सांगितले की, शिक्षकांनी विद्यार्थ्यांना केवळ अभ्यासक्रम पूर्ण करण्यापुरते मर्यादित न ठेवता त्यांच्या विचारशक्तीला चालना दिली पाहिजे, संवादासाठी मोकळे वातावरण निर्माण केले पाहिजे आणि विद्यार्थ्यांच्या जिज्ञासेला प्रोत्साहन दिले पाहिजे. पालकांनी गुणांच्या शर्यतीत मुलांना ढकलण्याऐवजी त्यांच्या नैसर्गिक क्षमतांची ओळख करून त्यांना योग्य दिशा दिली पाहिजे. मुलांच्या अपयशाकडेही शिकण्याची संधी म्हणून पाहिले पाहिजे, असा सल्ला त्यांनी यानिमित्ताने दिला.

पद्मश्री डॉ. अभय बंग यांचे संपूर्ण व्याख्यान केवळ माहितीपर नव्हते, तर ते अंतर्मुख करणारे, प्रेरणादायी आणि परिवर्तनाची दिशा देणारे होते. त्यांच्या विचारांनी उपस्थित श्रोत्यांच्या मनात आत्मपरीक्षणाची प्रक्रिया सुरू केली. व्याख्यानाच्या शेवटी सभागृह टाळ्यांच्या कडकडाटाने दुमदुमून गेले. सर्वांच्या चेहऱ्यावर नव्या विचारांची प्रेरणा आणि सकारात्मक बदलाची जाणीव स्पष्टपणे दिसून येत होती.

**अध्यक्षीय समारोप:**

अध्यक्षस्थानावरून बोलताना मा. डॉ. गोपाळराव पाटील, अध्यक्ष, शिवछत्रपती शिक्षण संस्था, लातूर यांनी अत्यंत विचारपूर्ण, दिशादर्शक आणि प्रेरणादायी शब्दांत आपले मनोगत व्यक्त केले. 'पर्यायी शिक्षण' ही केवळ संकल्पना किंवा चर्चेचा विषय नाही. आजच्या बदलत्या सामाजिक, तांत्रिक आणि जागतिक परिस्थितीत ती काळाची अपरिहार्य गरज आहे, असे त्यांनी ठामपणे नमूद केले. सध्याची शिक्षणव्यवस्था विद्यार्थ्यांना ज्ञान देत असली तरी जीवनदृष्टी, मूल्यसंवर्धन आणि सामाजिक जबाबदारी यांचा समतोल राखण्यात अनेकदा अपुरी पडते, याकडे त्यांनी लक्ष वेधले. त्यामुळे शिक्षणात परिवर्तन घडविण्यासाठी संस्थात्मक पातळीवर ठोस प्रयत्न होणे आवश्यक आहे, असे त्यांनी अधोरेखित केले. ते पुढे म्हणाले की, शिक्षणाचा उद्देश केवळ करिअर घडविणे किंवा आर्थिक स्थैर्य मिळवून देणे इतकाच मर्यादित नसावा, तर शिक्षणाने विद्यार्थ्यांना संवेदनशील, विचारशील, नैतिक आणि समाजाभिमुख नागरिक बनवले पाहिजे. गुणवत्तापूर्ण शिक्षण म्हणजे केवळ उत्कृष्ट निकाल नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होय. मूल्याधारित शिक्षणामुळेच समाजात प्रामाणिकपणा, समता, सहिष्णुता आणि सामाजिक ऐक्य टिकून राहू शकते, असे

त्यांनी स्पष्ट केले. संस्थेच्या वतीने बोलताना त्यांनी दृढ संकल्प व्यक्त केला की, शिव छत्रपती शिक्षण संस्था आणि राजर्षी शाहू महाविद्यालय यांच्या माध्यमातून गुणवत्तापूर्ण, मूल्यसमृद्ध आणि समाजाशी जोडले जाणारे शिक्षण देण्याची परंपरा अधिक सक्षमपणे पुढे नेली जाईल. शिक्षणात नाविन्यपूर्ण पद्धती, कौशल्याधारित उपक्रम, संशोधनवृत्ती आणि सामाजिक बांधिलकी यांना प्राधान्य दिले जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. शिक्षणाकडे केवळ स्पर्धा आणि गुणांच्या दृष्टीने न पाहता जीवन समजून घेण्याचे साधन म्हणून पाहावे, असे आवाहन त्यांनी केले. शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या जिज्ञासेला चालना द्यावी आणि पालकांनी मुलांच्या क्षमतांवर विश्वास ठेवावा, असेही त्यांनी सांगितले.

डॉ. गोपाळराव पाटील यांच्या अध्यक्षीय भाषणातून संस्थेची मूल्यनिष्ठ परंपरा, सामाजिक बांधिलकी आणि शिक्षणाविषयीची दूरदृष्टी स्पष्टपणे प्रतिबिंबित झाली. त्यांच्या प्रभावी शब्दांनी उपस्थितांच्या मनात शिक्षणाविषयी नवी उमेद व नव्या आशावादाची ज्योत प्रज्वलित झाली. त्यातून कार्यक्रमाला वैचारिक परिपूर्णता लाभली.

**कार्यक्रमाचे नियोजन व संयोजन:**

या व्याख्यानमालेच्या यशस्वी आयोजनामागे अत्यंत सुयोग्य नियोजन, अचूक समन्वय आणि सर्व संबंधितांच्या समर्पित परिश्रमांची भक्कम साथ लाभली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे आणि व्याख्यानमाला प्रभारी डॉ. संभाजी पाटील यांनी संपूर्ण कार्यक्रमाची आखणी अत्यंत जबाबदारीने व दूरदृष्टीने केली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विविध समित्यांचे गठन करण्यात आले होते. कार्यक्रमाची संकल्पना निश्चित करण्यापासून वक्त्यांशी संपर्क, निमंत्रण व्यवस्था, प्रसिद्धी नियोजन, सभागृहाची तयारी, तांत्रिक साधनसामग्रीची उपलब्धता, ध्वनी-चित्र व्यवस्था, अतिथी सत्कार, स्वागत समन्वय आणि उपस्थिती व्यवस्थापन या सर्व बाबी काटेकोर आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडण्यात आल्या. प्रत्येक घटकात वेळेचे नियोजन, कार्यसंघातील समन्वय आणि शिस्त यांचा उत्तम संगम दिसून आला. शिव छत्रपती शिक्षण संस्थेच्या सर्व युनिटचे प्राचार्य, मुख्याध्यापक, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संखेने उपस्थित होते. त्यामुळे संपूर्ण कार्यक्रम सुरळीत, प्रभावी आणि दर्जेदार पद्धतीने संपन्न झाला.

**प्रभाव व निष्कर्ष:**

'पर्यायी शिक्षण शक्य आहे' या विषयावरील हे व्याख्यान केवळ औपचारिक कार्यक्रम न ठरता एक सशक्त वैचारिक चळवळ होऊ शकते. या उपक्रमामुळे पर्यायी शिक्षणाविषयी सकारात्मक आणि विधायक चर्चा सुरू झाली आहे. वैचारिक जागरूकता, चिकित्सक दृष्टीकोन आणि समाजाभिमुख विचारसरणी अधिक दृढ झाली आहे. शिक्षकांना अध्यापनाच्या नव्या, नाविन्यपूर्ण आणि कौशल्याधारित पद्धतींचा गंभीरपणे विचार करण्याची प्रेरणा मिळाली. शिक्षण आणि समाज यांच्यातील परस्पर संबंध अधिक दृढ करण्याचा दृष्टिकोन विकसित झाला. हा कार्यक्रम शिक्षण व्यवस्थेकडे नव्या दृष्टीने पाहण्याची संधी देणारा आणि परिवर्तनाची दिशा दाखवणारा ठरला. शिव छत्रपती शिक्षण संस्थेच्या वैचारिक परंपरेला साजेसा, मूल्यनिष्ठ आणि भविष्यवेधी असा हा उपक्रम अत्यंत यशस्वी, प्रभावी आणि संस्मरणीय ठरला.

---

शाहू व्याख्यानमाला प्रभारी                                                                 प्राचार्य

त्यांनी स्पष्ट केले. संस्थेच्या वतीने बोलताना त्यांनी दृढ संकल्प व्यक्त केला की, शिव छत्रपती शिक्षण संस्था आणि राजर्षी शाहू महाविद्यालय यांच्या माध्यमातून गुणवत्तापूर्ण, मूल्यसमृद्ध आणि समाजाशी जोडले जाणारे शिक्षण देण्याची परंपरा अधिक सक्षमपणे पुढे नेली जाईल. शिक्षणात नाविन्यपूर्ण पद्धती, कौशल्याधारित उपक्रम, संशोधनवृत्ती आणि सामाजिक बांधिलकी यांना प्राधान्य दिले जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. शिक्षणाकडे केवळ स्पर्धा आणि गुणांच्या दृष्टीने न पाहता जीवन समजून घेण्याचे साधन म्हणून पाहावे, असे आवाहन त्यांनी केले. शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या जिज्ञासेला चालना द्यावी आणि पालकांनी मुलांच्या क्षमतांवर विश्वास ठेवावा, असेही त्यांनी सांगितले.

डॉ. गोपाळराव पाटील यांच्या अध्यक्षीय भाषणातून संस्थेची मूल्यनिष्ठ परंपरा, सामाजिक बांधिलकी आणि शिक्षणाविषयीची दूरदृष्टी स्पष्टपणे प्रतिबिंबित झाली. त्यांच्या प्रभावी शब्दांनी उपस्थितांच्या मनात शिक्षणाविषयी नवी उमेद व नव्या आशावादाची ज्योत प्रज्वलित झाली. त्यातून कार्यक्रमाला वैचारिक परिपूर्णता लाभली.

**कार्यक्रमाचे नियोजन व संयोजन:**

या व्याख्यानमालेच्या यशस्वी आयोजनामागे अत्यंत सुयोग्य नियोजन, अचूक समन्वय आणि सर्व संबंधितांच्या समर्पित परिश्रमांची भक्कम साथ लाभली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे आणि व्याख्यानमाला प्रभारी डॉ. संभाजी पाटील यांनी संपूर्ण कार्यक्रमाची आखणी अत्यंत जबाबदारीने व दूरदृष्टीने केली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विविध समित्यांचे गठन करण्यात आले होते. कार्यक्रमाची संकल्पना निश्चित करण्यापासून वक्त्यांशी संपर्क, निमंत्रण व्यवस्था, प्रसिद्धी नियोजन, सभागृहाची तयारी, तांत्रिक साधनसामग्रीची उपलब्धता, ध्वनी-चित्र व्यवस्था, अतिथी सत्कार, स्वागत समन्वय आणि उपस्थिती व्यवस्थापन या सर्व बाबी काटेकोर आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडण्यात आल्या. प्रत्येक घटकात वेळेचे नियोजन, कार्यसंघातील समन्वय आणि शिस्त यांचा उत्तम संगम दिसून आला. शिव छत्रपती शिक्षण संस्थेच्या सर्व युनिटचे प्राचार्य, मुख्याध्यापक, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संखेने उपस्थित होते. त्यामुळे संपूर्ण कार्यक्रम सुरळीत, प्रभावी आणि दर्जेदार पद्धतीने संपन्न झाला.

**प्रभाव व निष्कर्ष:**

'पर्यायी शिक्षण शक्य आहे' या विषयावरील हे व्याख्यान केवळ औपचारिक कार्यक्रम न ठरता एक सशक्त वैचारिक चळवळ होऊ शकते. या उपक्रमामुळे पर्यायी शिक्षणाविषयी सकारात्मक आणि विधायक चर्चा सुरू झाली आहे. वैचारिक जागरूकता, चिकित्सक दृष्टीकोन आणि समाजाभिमुख विचारसरणी अधिक दृढ झाली आहे. शिक्षकांना अध्यापनाच्या नव्या, नाविन्यपूर्ण आणि कौशल्याधारित पद्धतींचा गंभीरपणे विचार करण्याची प्रेरणा मिळाली. शिक्षण आणि समाज यांच्यातील परस्पर संबंध अधिक दृढ करण्याचा दृष्टिकोन विकसित झाला. हा कार्यक्रम शिक्षण व्यवस्थेकडे नव्या दृष्टीने पाहण्याची संधी देणारा आणि परिवर्तनाची दिशा दाखवणारा ठरला. शिव छत्रपती शिक्षण संस्थेच्या वैचारिक परंपरेला साजेसा, मूल्यनिष्ठ आणि भविष्यवेधी असा हा उपक्रम अत्यंत यशस्वी, प्रभावी आणि संस्मरणीय ठरला.

---

डॉ. संभाजी पाटील
शाहू व्याख्यानमाला प्रभारी
मराठी विभागप्रमुख
राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त),
लातूर ४१३ ५१२

Rajarshi Shahu Mahavidyalaya, Latur (Autonomous)

प्राचार्य
प्राचार्य
राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर
(स्वायत्त)

# राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर

(अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालय)

## शाहू व्याख्यानमाला : काही क्षणचित्रे



राजर्षी शाहू महाविद्यालय: छत्रपती शाहू महाराजांच्या प्रतिमेला अभिवादन करताना पद्मश्री मा. डॉ. अभय बंग, प्राचार्य मा. डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, पर्यवेक्षक डॉ. भीमराव पाटील व इतर मान्यवर



शिव छत्रपती शिक्षण संस्थेच्या सन्माननीय संस्थाचालकांसोबत विविध विषयावर चर्चा करताना पद्मश्री मा. डॉ. अभय बंग, शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माजी खा. डॉ. गोपाळराव पाटील, उपाध्यक्ष डॉ. अजय जाधव, सहसचिव श्री. उद्धव पाटील, माजी सचिव मा. प्राचार्य अनिरुद्ध जाधव, सदस्य प्राचार्य डॉ. रावसाहेब कावळे, सदस्य श्री. शिवाजी भोसले आदी



**'दोन ऋषींची भेट: वैचरिक आदान प्रदान'** प्रसंगी पद्मश्री मा. डॉ. अभय बंग आणि शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे माजी सचिव तथा लातूर पॅटर्नचे जनक प्राचार्य अनिरुद्ध जाधव



राजर्षी शाहू महाराजांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करताना पद्मश्री मा.डॉ. अभय बंग, शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माजी खा. डॉ. गोपाळराव पाटील, उपाध्यक्ष डॉ. अजय जाधव, सहसचिव डॉ. शिवाजीराव सूर्यवंशी, सहसचिव श्री. उद्धव पाटील, माजी सचिव मा. प्राचार्य अनिरुद्ध जाधव, सदस्य प्राचार्य डॉ. रावसाहेब कावळे, सदस्य श्री. शिवाजी भोसले, प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, शाहू व्याख्यानमाला प्रभारी डॉ. संभाजी पाटील



शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माजी खा. डॉ. गोपाळराव पाटील यांचे स्वागत करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपस्थित पद्मश्री मा. डॉ. अभय बंग, संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. अजय जाधव, सहसचिव श्री. उद्धव पाटील



पद्मश्री मा. डॉ. अभय बंग यांचे स्वागत करताना शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. डॉ. गोपाळराव पाटील, उपाध्यक्ष डॉ. अजय जाधव, सहसचिव डॉ. शिवाजीराव सूर्यवंशी, सहसचिव श्री. उद्धव पाटील, सदस्य प्राचार्य डॉ. रावसाहेब कावळे, सदस्य श्री. शिवाजी भोसले




'पर्यायी शिक्षण शक्य आहे' या विषयावर व्याख्यान देताना पद्मश्री मा. डॉ. अभय बंग, विचारपीठावर उपस्थित शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माजी खा. डॉ. गोपाळराव पाटील, उपाध्यक्ष डॉ. अजय जाधव, सहसचिव डॉ. शिवाजीराव सूर्यवंशी, सहसचिव श्री. उद्धव पाटील, सदस्य प्राचार्य डॉ. रावसाहेब कावळे, सदस्य श्री. अमर देशमुख, सदस्य श्री. धर्मराज हल्लाळे, प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, शाहू व्याख्यानमाला प्रभारी डॉ. संभाजी पाटील




व्याख्यानप्रसंगी पद्मश्री मा. डॉ. अभय बंग, विचारपीठावर उपस्थित शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माजी खा. डॉ. गोपाळराव पाटील, उपाध्यक्ष डॉ. अजय जाधव, सहसचिव डॉ. शिवाजीराव सूर्यवंशी, सहसचिव श्री. उद्धव पाटील, सदस्य प्राचार्य डॉ. रावसाहेब कावळे, सदस्य श्री. अमर देशमुख, सदस्य श्री. धर्मराज हल्लाळे, प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, शाहू व्याख्यानमाला प्रभारी डॉ. संभाजी पाटील




व्याख्यानप्रसंगी पद्मश्री मा. डॉ. अभय बंग, विचारपीठावर उपस्थित शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माजी खा. डॉ. गोपाळराव पाटील, उपाध्यक्ष डॉ. अजय जाधव, सहसचिव डॉ. शिवाजीराव सूर्यवंशी, सहसचिव श्री. उद्धव पाटील, सदस्य प्राचार्य डॉ. रावसाहेब कावळे, सदस्य श्री. अमर देशमुख, सदस्य श्री. धर्मराज हल्लाळे, प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, शाहू व्याख्यानमाला प्रभारी डॉ. संभाजी पाटील



व्याख्यानप्रसंगी पद्मश्री मा. डॉ. अभय बंग, विचारपीठावर उपस्थित शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माजी खा. डॉ. गोपाळराव पाटील, उपाध्यक्ष डॉ. अजय जाधव, सहसचिव डॉ. शिवाजीराव सूर्यवंशी, सहसचिव श्री. उद्धव पाटील, सदस्य प्राचार्य डॉ. रावसाहेब कावळे, सदस्य श्री. अमर देशमुख, सदस्य श्री. धर्मराज हल्लाळे, प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, शाहू व्याख्यानमाला प्रभारी डॉ. संभाजी पाटील, संस्थेचे सर्व मान्यवर आणि उपस्थित श्रोते.




डॉ. व्यंकट धुमाळ लिखित पुस्तकाचे विमोचन करताना पद्मश्री मा. डॉ. अभय बंग, शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माजी खा. डॉ. गोपाळराव पाटील, उपाध्यक्ष डॉ. अजय जाधव, सहसचिव डॉ. शिवाजीराव सूर्यवंशी, सहसचिव श्री. उद्धव पाटील, सदस्य प्राचार्य डॉ. रावसाहेब कावळे, सदस्य श्री. शिवाजी भोसले, सदस्य श्री. धर्मराज हल्लाळे, प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, शाहू व्याख्यानमाला प्रभारी डॉ. संभाजी पाटील आणि डॉ. व्यंकट धुमाळ




'शाहू व्याख्यानमाला'निमित्त संपन्न झालेल्या व्याख्यानानंतर पद्मश्री मा. डॉ. अभय बंग, शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माजी खा. डॉ. गोपाळराव पाटील, उपाध्यक्ष डॉ. अजय जाधव, सहसचिव डॉ. शिवाजीराव सूर्यवंशी, सहसचिव श्री. उद्धव पाटील, माजी सचिव मा. प्राचार्य अनिरुद्ध जाधव, सदस्य प्राचार्य डॉ. रावसाहेब कावळे, सदस्य श्री. अमर देशमुख, पत्रकार श्री. अरुण समुद्रे, अंनिसचे कार्याध्यक्ष माधव बावगे, व्याख्यानमाला प्रभारी डॉ. संभाजी पाटील व अन्य मान्यवर




शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे सन्माननीय संचालक मंडळासोबत चर्चा करताना पद्मश्री मा. डॉ. अभय बंग
शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माजी खा. डॉ. गोपाळराव पाटील, उपाध्यक्ष डॉ. अजय जाधव, सहसचिव डॉ. शिवाजीराव सूर्यवंशी, सहसचिव श्री. उद्धव पाटील, सदस्य प्राचार्य डॉ. रावसाहेब कावळे, सदस्य श्री. शिवाजी भोसले, प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, व्याख्यानमाला प्रभारी डॉ. संभाजी पाटील आणि विद्यार्थी परिषद सचिव फरदीन शेख




पद्मश्री मा. डॉ. अभय बंग यांच्या 'पर्यायी शिक्षण शक्य आहे' व्याख्यानानंतर विविध विषयावर चर्चा करताना शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माजी खा. डॉ. गोपाळराव पाटील, सहसचिव डॉ. शिवाजीराव सूर्यवंशी, सहसचिव श्री. उद्धव पाटील, माजी सचिव मा. प्राचार्य अनिरुद्ध जाधव, सदस्य प्राचार्य डॉ. रावसाहेब कावळे, सदस्य श्री. शिवाजी भोसले

---

डॉ. संभाजी पाटील
शाहू व्याख्यानमाला प्रभारी
**मराठी विभागप्रमुख**
**राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर ४१३ ५१२**

Rajarshi Shahu Mahavidyalaya, Latur (Autonomous)

प्राचार्य
**प्राचार्य**
**राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर (स्वायत्त)**